दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २५३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२४ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# समाजा-समाजात तेढ निर्माण होऊ नये हीच भावना, कोणावरही अन्याय होणार नाही

## हाकेंचे उपोषण मागे, मुख्यमंत्र्यांनी मानले आभार



**नाशिक (वृत्तसंस्था)–जालन्यातील वडीगोद्री येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे गेल्या १० दिवसांपासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण नको, या मागणीसाठी उपोषणाला बसले होते. आज राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने हाके आणि वाघमारे यांची भेट घेत झालेल्या चर्चेअंती लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी उपोषण स्थगित केले. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. ते नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलत होते.एकनाथ शिंदे म्हणाले की, ओबीसी आंदोलकांच्या मागणीसंदर्भात काल बैठक झाली होती. कालच्या बैठकीत दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतरही सर्वजण उपस्थित होते. समाजा–समाजात तेढ निर्माण होवू नये, यासाठी चर्चा करण्यात आली. मराठा आणि ओबीसी समाजात वाद होवू नये, यासाठी चर्चा झाली. अधिवेशनाच्या काळात काही मुद्द्यांवर सर्वपक्षीय बैठक घेण्याचे ठरवण्यात आले आहे. लक्ष्मण हाके यांनी आंदोलन मागे घेतले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.**



नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज किशोर दराडे यांच्या प्रचारासाठी आलो आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात आई वडिलांनंतर शिक्षकाचे महत्त्व आहे. देशाची सुजाण सुसंस्कृत पिढी घडविण्याचे काम शिक्षक करतो. ही निवडणूक सर्वांसाठी महत्वाची आहे. शिक्षकांमध्ये मोठी ताकद असते.शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत काही चुका आहेत. पण, मागील पराभवाचे उट्टे काढण्याची संधी आपल्याला आहे. आचारसंहिता संपल्यानंतर सर्व प्रलंबित मागण्या पूर्ण करू. हे सरकार शिक्षकांचे आहे. शिक्षकांना नेहमी खुश ठेवले पाहिजे. शिक्षक म्हणजे एलआयसीसारखे नोकरीत असताना आणि निवृत्त झाल्यानंतरही शिक्षक कामाचे असतात, असे त्यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात

### आरक्षण हा व्यक्तीचा नव्हे समाजाचा प्रश्न

**लातूर**–मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा हा सर्वांनी सर्वानुमते सोडवावा. यासाठी कोणताही राजकीय पक्ष विचार तिथे नकोय. त्या समाजाचा प्रश्न म्हणून तो मार्गी लागला पाहिजे, राजकीय जोडे बाजूला ठेवून हा प्रश्न सोडवला जावा, असे मत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केले. ते लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलत होते.माजी राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, राजकीय पक्षाने आपले राजकीय जोडे बाहेर सोडून आरक्षणाचा मुद्दा सोडवावा. मराठा आणि ओबीसी आरक्षणाचे राजकारण कोणीही करू नये. हा विषय कोणत्याही एका राजकीय पक्षाचा विषय नाही तर समाजाचा विषय आहे.दानवे म्हणाले की, आमच्या सरकारने सर्व विरोधी पक्षाची बैठक बोलावून मराठा आरक्षणाचा मार्ग काढला होता. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं होत. मनोज जरांगे यांनी त्यांच्या उपोषणचा मार्ग चालू ठेवला आहे. सरकार त्यांच्या उपोषणाचा विचार करेल आणि मराठा आणि ओबीसीच्या जटील प्रश्नावर मार्ग काढेल.

### राजकीय करिअर संपवण्याच्या धमकीला मी घाबरत नाही

**मुंबई**–राजकीय करिअर संपवण्याच्या धमकीला छगन भुजबळ घाबरत नाही. उद्या मी घरी बसलो तरी ओबीसी समाजाच्या मुद्द्यावरुन रस्त्यावर उतरुन लढेन, असे छगन भुजबळ यांनी म्हटले. भुजबळ शनिवारी जालन्याला लक्ष्मण हाके यांच्या भेटीसाठी रवाना होण्यापूर्वी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे, मग आमदारीकचे काय घेऊन बसला आहात. माझे राजकीय करिअर हे पुढे न्यायचे की नाही, हे माझ्या पक्षाच्या आणि जनतेच्या हातात आहे. जनतेचे कोर्ट हे सर्वश्रेष्ठ आहे. जरांगे म्हणतात त्याप्रमाणे माझे मंत्रिपद गेले, राजकीय करिअर उद्धस्त होऊन मी घरी बसलो तरी मी ओबीसींच्या मुद्द्यावर रस्त्यावर उतरून लढत राहीन.छगन भुजबळ म्हणाले की, राज्य सरकार घरांची व्यवस्था करत आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवत आहे. कर्जमाफीच्या योजना आखत आहे, फी माफी करत आहे. शहरांमध्ये शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहं उपलब्ध करुन देत आहे, वसतिगृह नसतील तर विद्यार्थ्यांना पैसे देत आहे. मग आता काय अडचण आहे.

### गोपीनाथ मुंडेंनी माझ्यावर मुलासारखे प्रेम केले

**मुंबई**–केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याबाबत एक मोठे विधान केले आहे. गोपीनाथ मुंडे यांनी माझ्यावर मुलासारखं प्रेम केले. माझे यश पाहण्यासाठी गोपीनाथ मुंडे असायला हवे होते असे म्हणत ते भावुक झाले होते. त्यांच्यामुळेच मी घडलो असे म्हणत मोहोळ यांनी गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना उजाळा दिला आहे. एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत ते बोलत होते.याबाबत बोलतांना मोहोळ म्हणाले, ''मला केंद्रीय मंत्रिपदाची जबाबदारी मिळेल अशी आशा नव्हती. मात्र मला केंद्रीय मंत्रिपद मिळणार असे कळले तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. शपथविधीच्या आदल्यादिवशी मला राष्ट्रीय अध्यक्षांच्या पीएचा फोन आला आणि मला शपथविधीसाठी तयार राहायला सांगितले. सुरुवातीला मला काही समजेना. शेतकऱ्याचा मुलगा होतो, घरच्या उसाच्या गाड्यावर काम केले. पण माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला ही संधी फक्त भाजपातच मिळू शकते'', अशा भावना मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या आहेत.

# सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मूल बस स्थानकावर पोलीस चौकी उभारा

## महिला शिपायांची नियुक्ती करण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**मूल । प्रतिनिधी**




मुल बसस्थानकावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असून त्यात शाळा कॉलेजमध्ये येणारे विद्यार्थी,विद्यार्थीनी आणी ग्रामीण भागातील महिला भगिनी, शासकीय महिला कर्मचारी यांची सुद्धा संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

बरेचदा वेळेवर येणाऱ्या समस्यामुळे वेळेवर बस उपलब्ध झाली नाही तर घरी जाण्यासाठी रात्र झाली तर महिला भगिनींना उशिरापर्यंत बसस्थानकावर राहावे लागते.या संधीचा फायदा घेत अनेकदा टवाळखोर पोरांकडून विद्यार्थिनी महिलांना छेडण्याचा प्रकार होत असतो. यामुळे त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊन न्यूनगंड तयार होण्याची भीती आहे.हा प्रकार रात्रच नाही तर दिवसाढवळया सुद्धा अनेकदा मूल बसस्थानकावर झालेला आहे.तसेच मूल बसस्थानकावरून अनेकदा प्रवाशांचे पॅकेट मारले गेले आहे.बस स्थानकावर टू व्हीलर ठेवणाऱ्या अनेक प्रवाशांच्या टू व्हीलर सुद्धा चोरीला गेलेल्या आहेत.सर्व बाबीचा विचार करता मूल बस स्थानकावर स्वतंत्र पोलीस चौकी उभारत महिला पोलीस शिपायांसह पोलीस शिपाई यांची नियुक्ती करून महिलांना विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून आधार द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष आकाश येसनकर यांनी चंद्रपूर जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांची उपस्थिती.यावेळी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी तात्काळ मुल पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांकडून अहवाल मागून पोलीस चौकी सुरु करण्यासाठी सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# गिमाटेक्स वणी युनिटच्या कामगारांकडून मृत कामगाराच्या परीवाराला मदतीचा हात



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

गिमाटेक्स वणी युनिट येथिल मृत कामगार श्री सुरेश हुलके हा कामगार पिप्रटरी पिव्ही विभागात कामगार म्हणून कार्यरत होता.

गेल्या काही महिन्यापुर्वी दि. ०५ एप्रिल रोजी चिमुर- शंकरपुर मार्गाने जात असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्या अनुषंगाने कामगारांच्या कराराप्रमाणे संघटनेचे अध्यक्ष तथा विधानसभा क्षेत्राचे आमदार समिर कुणावार यांच्या निर्देशानुसार गिमाटेक्स व्यवस्थापनाकडे पाठपुरावा करून कामगारांच्या वेतनातून प्रती कामगार १०० रू कपात करून एकुन १लाख ४२ हजार २०० रूपयांचा धनादेश मृत कामगाराचे परीवाराला देण्यात आला. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष मिलिंद देशपांडे ,जनरल सेक्रेटरी पांडुरंग बालपांडे, दामोदर देशमुख, जिवन भानसे, मनोज जुमडे,विनोद कावळे,श्रावण थुटे,जयंत बावणे,दिवाकर बरबटकर, राकेश तराळे,प्रशांत शेळके,विजय थुल,विनोद कोल्हे, लक्ष्मण जयपुरकर, राहुल देशमुख,हेमंत भगत इत्यादी उपस्थित होते.

# बांबू संशोधन प्रशिक्षण संस्थेला देशातील अग्रगण्य संस्था करणार

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बांबू क्षेत्रात संशोधन प्रशिक्षण आणि कौशल्य विकासासाठी असलेली चिचपल्ली (जि.चंद्रपुर) येथील बीआरटीसी ही देशात एकमेव संस्था आहे. संशोधनासोबतच रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. बांबू तसेच उद्योग क्षेत्रात चालना देणारी देशातील ही एक अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपास नक्की येईल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.वन अकादमी येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा (बीआरटीसी) आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक अशोक खडसे, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, मुकेश टांगले, भूषण येरगुडे, अपर संचालक मनिषा भिंगे, डॉ. मंगेश गुलवाडे, प्रकाश धारणे आदी उपस्थित होते. ४ डिसेंबर २०१४ रोजी बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेची निर्मिती झाली असून राज्याच्या वनविभागाची ही एक स्वायत्त संस्था आहे, असे सांगून वनमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, जिल्ह्यात ताडोबा - अंधारी हा जगप्रसिद्ध व्याघ्र प्रकल्प आहे. ताडोबातील बफर झोनमधील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या अर्ध्या क्षेत्रात अनुदानावर बांबू लागवडीसाठी प्रवृत्त करावे. सोबतच भाजीपाला क्लस्टर सुद्धा देता येईल का, याचा विचार करावा. या संस्थेतील फायर फायटिंग व्यवस्था अतिशय अत्याधुनिक, तंत्रशुद्ध व अचूक असावी. सादरीकरणांमध्ये ज्या बाबी ठरविण्यात आल्या आहेत, त्याचे प्रमुख उद्दिष्ट ठरविणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत सविस्तर आराखडा तयार करून टाटा ग्रुप, अदानी ग्रुप, दालमिया यांच्याशी सुद्धा बांबू उत्पादनाबाबत चर्चा करावी. सोबतच बांबू लागवड आणि उत्पादनासाठी लघु व सूक्ष्म उद्योग (एम. एस. एम. ई.)अंतर्गत काही नियोजन करता येते, का त्याचा सुद्धा अधिकाऱ्यांनी अभ्यास करावा. बांबू लागवड, उत्पादन व त्यातून कौशल्य विकास या संदर्भात पीएम विश्वकर्मा योजनेत या बाबींचा समावेश करण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर म्हणाले, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने देशात बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था (बीआरटीसी) ही भारतात एकमेव संस्था उभी राहिली आहे. प्रशिक्षणासोबतच शिक्षण, त्याचे सादरीकरण




त्यातून रोजगार याबाबतीत ही संस्था देशपातळीवर नावारूपास येणे गरजेचे आहे. राज्यातील शेतकऱ्यांना सुद्धा या संस्थेमध्ये बांबू विषयक प्रशिक्षण देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सादरीकरणात बीआरटीसी चे संचालक अशोक खडसे म्हणाले, समाज, नागरिक आणि उद्योगांच्या प्रगतीसाठी बांबूक्षेत्रात स्वयंरोजगार निर्माण करणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. बीआरटीसी अंतर्गत बांबू टेक्नॉलॉजी मध्ये डिप्लोमा, शेतकऱ्यांना प्रशिक्षण आणि बांबू व्होकेशनल ट्रेनिंग देण्यात येत आहे. सोबतच महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या सहकार्याने सहा ठिकाणी सुविधा केंद्र (सीएफसी) सुरू करण्यात आले आहे. तसेच पोंभूर्णा येथे बांबूपासून अगरबत्ती निर्मिती युनिट सुद्धा कार्यान्वित करण्यात आले आहे. बांबू पासून निर्माण करण्यात आल्या वस्तूंची विक्री चंद्रपूर, मोहर्ली, कोलारा आणि बल्लारपूर येथे होत आहे. भविष्यात येथे विविध प्रशिक्षण आयोजित होणार असल्यामुळे वसतिगृहाची निर्मिती, इंडक्शन किचनसाठी इलेक्ट्रॉनिक वस्तू, आग प्रतिबंधक व्यवस्था व त्याची देखभाल दुरुस्ती, पाणी शुद्धीकरण प्रकल्प, इंटरनेट आणि वायफाय सुविधा, डिजिटल लॅब, टिशू कल्चर लॅब, ऑडिटोरियम, सौर ऊर्जा व्यवस्था, वाहतुकीसाठी ३० आसन व्यवस्थेची बस, परिसरात सादरीकरणासाठी डिस्प्ले युनिट्स, एक्जीबिशन हॉल, आरोग्य केंद्र, क्रीडा सुविधा, कंप्यूटर लॅब, लायब्ररी, आदींचा विस्तार करण्यात येणार आहे. सन २०१७ पासून डिप्लोमा इन बांबू टेक्नॉलॉजी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असून जून २०२४ पासून विद्यार्थी क्षमता ३० करण्यात आली आहे. सन २०२३ - २४ मध्ये बांबू निर्मिती, हँडीक्राफ्ट आणि कौशल्य विकास, फर्निचर बनविणे, निवासी व अनिवासी शेतकरी प्रशिक्षण, बांबूपासून ज्वेलरी, बास्केट, आदी संदर्भातील १७ प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले असून यात ५१६ नागरिक सहभागी झाले होते. आगामी काळात नवीन फॉरेस्ट गार्ड साठी बांबूबाबत मूलभूत प्रशिक्षण, विदर्भ आणि राज्यस्तरावरची कार्यशाळा, बांबू क्षेत्रातील उत्कृष्ट कारागीर आणि तज्ज्ञांद्वारे कॉन्फरन्स, व्होकेशनल ट्रेनिंग, शेतकरी ट्रेनिंग आदी घेण्याचे नियोजन आहे, असे अशोक खडसे यांनी सांगितले.

**बॉटनिकल गार्डनच्या नियामक मंडळाची सभा :** विसापूर येथे असलेल्या श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बॉटनिकल गार्डनच्या नियामक मंडळाची सभा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रस्तावित बाबींना मान्यता देऊन उर्वरित कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. बॉटनिकल गार्डनबाबत क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी सादरीकरण केले.

# वारी : वारकरी संप्रदायातील आचारधर्म!

**आषाढी एकादशीसाठी पंढरपूर येथे जाणारी वारकरी पदयात्रा होय. वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय होय. या संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी. या वारीमध्ये अनेक जाति-धर्मांचे लोक मराठा, सोनार, कुंभार, चांभार, माळी, महार, कुणबी, न्हावी, तेली, धोबी, लिंगायत व इतर जातींचे भाविक भक्त सुद्धा जास्तीत जास्त संख्येने सहभागी होतात. वारी हा एक आनंद सोहळा असतो. तो सोहळा पंढरपूरकडे विविध संतांच्या पालख्या प्रस्थानापासून सुरू होत असतो. भक्तिवर्धक प्रेरणादायक लेख संत चरणरज: श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी वाचकांच्या सेवेत सविनय सादर केलाय... संपादक.**



वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळी होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. संतोक्ती साक्ष देते-

पंढरीच्या लोका नाही अभिमान!
पाया पडती एकमेका होऊनी लहान!!

वारी करणाऱ्या व्यक्तीस वारकरी म्हणतात. भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे- विठ्ठलाचे हे भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असता ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. या माळेच्या जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याविना वारकरी होता येत नाही, असे वारकरी पंथ सांगतो.

स्नान करून भाळी गोपीचंदनाचा टिळा लावावा. नित्यनेमाने हरिपाठ म्हणावा. संतांचे ग्रंथ वाचावेत. देवाच्या मूर्तीचे दर्शन घ्यावे. भजन-कीर्तनात सहभाग घ्यावा. पंढरपूरवारी करावी तसेच एकादशीव्रत करावे. वारकऱ्याने पंढरपूरमध्ये सात्त्विक आहार व सत्त्वाचरण करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे, असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी असतो. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते-

पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान!
आणिक दर्शन विठोबाचे!!

या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे, असे मानले जाते.

वारकरी महावाक्य- वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना- पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जयऽऽऽ! असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात पंढरीनाथ भगवान की जय, असाही भेद आढळतो. अनेक ठिकाणी माउली ज्ञानेश्वर महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय, शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय अशीही विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातींच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करून घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत पुढे संत एकनाथ महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज, संत मल्लप्पा वासकर यांसारख्या संतांनी वारीची परंपरा चालवली. संत तुकाराम महाराज यांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात- पंढरपूरची वारी हा वारकरी संप्रदायाचा मुख्य आचारधर्म होय. वारी ही ज्ञानदेव पूर्वकालीन प्रथा आहे, किंबहुना वारकरी हे नावच वारीमुळे पडले आहे. वारीतून या संप्रदायाची सामाजिकता आणि समाजाभिमुखता स्पष्ट होते. वारीची परंपरा सर्व संतांनी जतन केली आहे. ज्ञानदेवांच्या कर्तृत्वामुळे हा संप्रदाय जनमानसावर प्रभाव गाजवून महाराष्ट्रव्यापी झाला; परंतु संप्रदायाचा आद्य प्रवर्तक ठरतो भक्त पुंडलिकच! भक्त पुंडलिकापासून या संप्रदायाला इतिहासाला सुरुवात होते. या इतिहासाचे पुढील कालखंडांत विभाजन असे करता येईल- ज्ञानदेवपूर्व काळ- भक्त पुंडलिकाचा काळ, ज्ञानदेव-नामदेव काळ, भानुदास-एकनाथांचा काळ, तुकोबा-निळोबांचा काळ, तुकारामोत्तर तीनशे वर्षांचा काळ. म्हणून वारकरी पंढरीमहिमा गात गात जातात-

जाता पंढरीशी सुख वाटे जीवा।
आनंदे केशवा भेटताचि।।
या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी।
पाहिली शोधोनि अवघी तीर्थे।।
सेना म्हणे खुण सांडी सांडी संती।
यापरती विश्रांती न मिळे जीवा।।
विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,
हरि ओम विठलाऽऽऽ...।।

वारीच्या परंपरेची माहिती मुलांना विशेषतः पुढील पिढ्यांना होण्यासाठी बालगटाच्या शाळा ते माध्यमिक शाळा यांमध्ये आषाढी एकादशीच्या आधी वारीचे आयोजन केले जाते. विद्यार्थी-विद्यार्थिनी वारकरी पोशाख घालून येतात आणि पालखी सजवून त्यात विठ्ठल-रखुमाई यांची पूजा करून पालखी सोहळा साजरा करतात. शहरातील निवडक माध्यमिक शाळांतील मुले प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी होतात आणि वारकरी भक्तांशी संवाद साधतात, ठरावीक अंतर पायी चालून वारीचा अनुभव घेतात. सायकल वारी- वारीतील विविध सुविधांची पाहणी करण्यासाठी २००० युवक सायकल वारी करतील अशी योजना २०१७ साली करण्यात आली. वारीतील गर्दीमुळे होणारी अस्वच्छता दूर करण्यासाठी वारीनंतर पंढरपुरात तसेच वारीमार्गावर स्वच्छता अभियान राबविले जाते.

पंढरपूरला जात असलेल्या वारकरी समुदायाची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारकऱ्यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, वर्षावस्त्र देणे, अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा त्यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे एवढाच भाव नाही तर त्यांच्या रुपातील विठ्ठल परब्रह्माला पुजणे, असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांची शारीरिक चाचणी, आरोग्य व उपचार यांची काळजी घेतात. वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात. पालकी मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फे केली जाते. चला, आपणही सुरात सूर मिसळत गाऊ-

विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,
विठ्ठल विठ्ठल विठ्ठलाऽऽऽ...।
का गा ना येशी विठ्ठला।
ऐसा कोण दोष मला।।
दीनानाथ दीनबंधू।
जनी म्हणे कृपासिंधू।।

वारी सगळ्यांनाच माहीत आहे. मात्र परतवारी माहीत असणारे आणि ती करणारे लोक खूप कमी आहेत. वारी करताना जागोजागी पावलापावलांवर दानशूर लोक सोयी सुविधा उपलब्ध करून देतात. मात्र परतवारीच्या वेळी अतिशय कष्टप्रद प्रवास करावा लागतो. वारीला ग्लॅमर आहे, तर परतवारीला लाट ओसरून गेल्यानंतरचं उदासवाणे वातावरण बघावयास मिळते. परतवारीलाही वरीलप्रमाणे सर्व सोयी सुविधा व आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात अशी याद्वारे एक रास्त व माफक अपेक्षा!

!! पंढरपूर आषाढ वारी व जत्रेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# विवेकानंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिनानिमित्त बॉक्सिंग स्पर्धाचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

२३ जून २०२४ रोज रविवारला स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात चंद्रपूर जिल्हा बॉक्सिंग संघटनेच्या माध्यमातून विवेकानंद महाविद्यालय आणि चंद्रपूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर यांच्या सहकार्यातून व भद्रावती तालुका बॉक्सिंग संघटनेच्या परिश्रमातून आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त बॉक्सिंगच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सदर बॉक्सिंग स्पर्धेत चंद्रपूर जिल्हा बॉक्सिंग संघटननेचे मार्गदर्शक व संस्थापक अध्यक्ष डॉ बी.प्रेमचंद, राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू तसेच माजी उपाध्यक्ष प्रफुल्ल चटकी, जयश्री देवकर, भद्रावती तालुका क्रीडा अधिकारी वरोरा तालुका क्रीडा अधिकारी व बॉक्सिंग प्रशिक्षक श्री विजय डोबाळे , चंद्रपूर जिल्हा व महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे महासचिव डॉ. राकेश तिवारी, शिल्पा तिवारी, स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरियल रवींद्र शिंदे ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जी उमाटे, पत्रकार प्रा. डॉ. यशवंत घुमे, डॉ. अमित प्रेमचंद, डॉ. दिलीप



बगडे, ड. मिलिंद रायपुरे,संजय गुंडावार राजू गुंडावार, डॉ. सपना खुटेमाटे, कृत्तांत सहारे, मनोज पेटकर, सोनल उमाटे हेलपिंग हॅन्ड एन. जी. ओ. भद्रावती चे पदाधिकारी, शितल मांडवकर, आदी मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले विजेता खेळाडूंना पदक व ऑलम्पिक दिनानिमित्त आयोजित स्पर्धेत सर्व सहभागी खेळाडूंना २-२ नोटबुक देऊन त्यांचे मनोबल वाढवण्यात आले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोराचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे, सचिव अमन टेमुर्डे आणि सर्व पदाधिकारी, यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. संगिता आर. बांबोडे, कु. वर्षा कोयचाळे, सौ. लता इंदूरकर (तिवारी), श्री. शुभम जुगनाके, शिवानी रॉय, श्री. कोमल वाकडे, पंकज शेंडे, पौर्णिमा शेंडे, खुशाल मांढाळे, कु. प्रियंका मांढरे, रोहन मोटघरे, सीमा बेहरा, पुष्पा नेट्टी, वामन अंडरस्कर, आशिष दुपारे. या स्पर्धेचे आयोजन विवेकानंद महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापिका संगीता आर. बांबोडे यांनी प्रयत्न केले.

## गोपीनाथ मुंडेंनी माझ्यावर मुलासारखे प्रेम केले

# आज ते असायला हवे होते, गोपीनाथ मुंडेंच्या आठवणीत केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ भावुक

**पुणे**-केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याबाबत एक मोठे विधान केले आहे. गोपीनाथ मुंडे यांनी माझ्यावर मुलासारखं प्रेम केले. माझे यश पाहण्यासाठी गोपीनाथ मुंडे असायला हवे होते असे म्हणत ते भावुक झाले होते. त्यांच्यामुळेच मी घडलो असे म्हणत मोहोळ यांनी गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना उजाळा दिला आहे. एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत ते बोलत होते.

याबाबत बोलतांना मोहोळ म्हणाले, ''मला केंद्रीय मंत्रिपदाची जबाबदारी मिळेल अशी आशा नव्हती. मात्र मला केंद्रीय मंत्रिपद मिळणार असे कळले तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. शपथविधीच्या आदल्यादिवशी मला राष्ट्रीय अध्यक्षांच्या पीएचा फोन आला आणि मला शपथविधीसाठी तयार राहायला सांगितले. सुरुवातीला मला काही समजेना. शेतकऱ्याचा मुलगा होतो, घरच्या उसाच्या गाड्यावर काम केले. पण माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला ही संधी फक्त भाजपातच मिळू शकते'', अशा भावना मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या



आहेत.पुढे मोहोळ यांनी गोपीनाथ मुंडे यांच्याबाबत भाष्य केले आहे. यावेळी ते भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. ''गोपीनाथ मुंडे लोकनेते होते, त्यांचा सहवास आम्हाला लाभला. त्यांच्यासह एक पिढी घडली. गोपीनाथ मुंडेंनी माझ्यावर मुलासारखं प्रेम केले. आज या सगळ्या आनंदात मला सर्वात जास्त आठवण कुणाची येत असेल, कुणाला मी मिस करत असेन तर ते गोपीनाथ मुंडेंना. मी त्यांच्या खूप जवळचा होतो. आज ते असते तर त्यांना खूप आनंद झाला असता. आजचा दिवस बघायला ते असायला हवे होते'', असे मोहोळ म्हणाले.

तसेच आपला पराभव झाल्यास गोपीनाथ मुंडेंसमोर गेलो नव्हतो असेही मोहोळ म्हणालेत. ''कार्यकर्त्यांवर प्रेम करणारा नेता अशी गोपीनाथ मुंडेंची ओळख होती. २००९ मध्ये त्यांनी आदेश दिला आणि मी खडकवासला विधानसभा निवडणूक लढवली. पण पराभव झाल्यानंतर भीतीमुळे मी गोपीनाथ मुंडेंच्यासमोर जात नव्हतो. असं दोन-तीनवेळा झाल्यानंतर गोपीनाथ मुंडेंना ते लक्षात आले. पुण्यात आल्यानंतर त्यांनी मला बोलवून घेतले आणि सांगितले की त्यांच्या आयुष्यातील पहिली निवडणूक ते हरले होते. त्यामुळे कसलाही विचार करू नकोस, कामाला लाग. त्यानंतर आजचा दिवस उजाडला'', असे मोहोळ म्हणाले.

# पीएम विश्वकर्मा योजना मार्गदर्शन कार्यक्रम कुशल कामगारांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल-आ.जोरगेवार

## पीएम विश्वकर्मा योजना मार्गदर्शन कार्यक्रम, सुतार (झाडे) समाजाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासनाच्या अनेक योजना आहेत. मात्र त्या शेवटच्या गरजू घटकापर्यंत पोहोचविण्याचे मोठे आव्हान राहिले आहे. परिणामी अनेक पात्र लाभार्थी अशा समाजउपयोगी योजनांपासून वंचित राहत आहेत. मात्र सुतार (झाडे) समाजाने आज पीएम विश्वकर्मा योजना मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करत सदर योजनेचे फायदे समाजाला पटवून दिले आहेत. हे आयोजन नक्कीच समाजातील कुशल कामगारांच्या उज्वल भविष्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल ठरेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

सुतार (झाडे) समाज महासंघ आणि महाराष्ट्र राज्य विश्वकर्मीय सुतार समाज समन्वय समिती तसेच महासंघांतर्गत महासंघ सखी व युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या सभागृहात सुतार (झाडे) समाज आर्थिक महामंडळ तसेच पीएम विश्वकर्मा योजना मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी आ. जोरगेवार बोलत होते. या कार्यक्रमाला सेवा निवृत्त को-ऑपरेटिव्ह अधिकारी माणिकराव गहोकर, माजी प्रादेशिक व्यवस्थापक राजेंद्र राजुरकर, मेहकर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. संजय रायमुलकर, विद्यानंद मानकर, नारायण क्षीरसागर, मुकेश मुंजनकर, प्रदीप जानवे, ज्योती राखुंडे, सतीश माणुसमारे, यांच्यासह इतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, सुतार समाज हा कष्टकरी समाज आहे. या समाजाच्या हाताला कला-कौशल्य आहे. मात्र आता नवी पिढी रोजगाराकडे वळल्याने ही अमूल्य संपत्ती नष्ट होत आहे. आपण उच्च शिक्षण घेतले पाहिजे. मात्र त्याचबरोबर आपला पारंपरिक व्यवसायही आपण केला पाहिजे. या व्यवसायाला नव्या तंत्रज्ञानाची जोड देत एका वेगळ्या पद्धतीने आपण आपल्यातील हस्तकलेचे कौशल्य जगासमोर नेले पाहिजे असे यावेळी आ. जोरगेवार म्हणाले. प्रत्येक समाजाच्या विकासात आणि प्रगतीत कामगार, कारीगर आणि छोटे उद्योजक यांचे योगदान अनमोल असते. आपल्या देशातील विविध क्षेत्रातील कुशल कामगारांनी आपल्या कौशल्यांनी देशाची अर्थव्यवस्था बलशाली केली आहे. पीएम विश्वकर्मा योजना या सर्व कुशल कामगारांसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आपल्या कारीगरांना आणि कुशल कामगारांना त्यांचे कौशल्य अधिकाधिक विकसित करण्याची संधी देणे आणि त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. आपल्या देशात विश्वकर्मा समाजाच्या पारंपारिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे. या योजनेद्वारे आपल्या उत्पादनांचे ब्रँडिंग, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि जागतिक बाजारपेठेत त्यांना स्थान मिळवून देण्याचे काम केले जाते. ही योजना आपण समाजाच्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचविल्यास समाजातील कारीगर आणि कुशल कामगारांना एक नवीन दिशा मिळेल. त्यांना त्यांचे काम अधिक प्रभावीपणे करण्याची संधी मिळेल. आजचा हा मार्गदर्शन कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे. या कार्यक्रमातून आपण या योजनेची माहिती आपल्या गावांमध्ये, शहरांमध्ये आणि आपल्या परिवारांमध्ये पोहोचावी, त्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिवंतपणीच आई-वडीलाची सेवा करा नंतर फुकट आव आणुन उपयोग नाही-ह.भ.प.ज्ञानेश्वर मा.महाराज

**दानापूर । प्रतिनिधी**

स्वामी तीन्ही जगाचा आई विना भिकारी या उक्तिप्रमाणे जो विश्वाचा निर्माता आहे. तो देखील आई विना भिकारी आहे.आई- वडील हे जगातील सर्वात अनमोल व मोल्यवान संपत्ती आहे.यासाठी त्यांना जिवंतपणीच जिव लावा नंतर ते देवा घरी गेल्यावर फुटकचा आव आणुन काहीच उपयोग होत नाही.शिवाय आज बरेच जण आपल्या जन्मदात्या आई वडीलांना उपाशीपोटी ठेवून दोन धाम,चार धाम करतात परंतु ज्या घरात आईवडील उपाशी झोपतात त्या घरात कधीच वैभवाची प्राप्ती होत नसल्याचे निरुपण ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली महाराज शेलुदकर यांनी एका कार्यक्रमात केले. भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे कै.गणेशराव उत्तमराव देशमुख यांच्या उत्तरकार्याच्या आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.पुढे बोलताना महाराज म्हणाले की आई-वडीलांची सेवा केल्याने जगातील कुठलेही सुख तुमच्यापासुन दुर राहत नाही.आजच्या तरुणांनी श्रावण बाळाप्रमाणे आई-वडीलाची सेवा केली पाहीजे.लहानपणी तुमचे प्रत्येकाचे आई वडील आपल्या मुलासांठी रात्रीचा दिवस करतात,हाडांच माड करतात,रक्ताचे पाणी करतात व आपल्याला शिकवतात याची जाणीव मुलांनी ठेवली पाहीजे.बाप जोपर्यंत घरात आहे तोपर्यंत घराकडं कुणाची वाकडी नजर करुन पाहण्याची हिंमत होत नाही.यासाठी बापाचा आदर करा.बाप हा खुप हावळ्या मनाचा असतो त्याला जिव लावा.तसेच युकवकानी व्यसनमुक्त जिवन जगून प्रत्येक क्षेत्रामध्ये आत्मविश्वासाने धेय्याची उंच भरारी घेतली पाहीजे.जो मनामध्ये ध्येय ठेवुन वाटचाल करीत असतो.तोच जिवनात यशाचा डोलारा ऊभा करीत असतो.यासाठी प्रत्येकाने जिवनात यश कसे खेचुन आणता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.आपण ईतिहास जर चाळला तर शिवबांच्या काळातील मावळे हे शिवबांसाठी मृत्यूला आलिंगन देण्यासाठी तयार होते.शिवाबाने देखील आपल्या आईच्या प्रेरणेने स्वराज्याची स्थापना करुन एक आगळावेगळा कधी न पुसणारा ईतिहास रचला आहे.परंतु आजच्या



कलयुगातील मावळे हे आपल्या आई वडीलांना वृद्धाश्रमात पाठवत आहे.ही खुप मोठी शोंकातीका आहे.शिवबांनी आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिवाची बाजी लावून समाजाची व देशाचे रक्षण करुन स्वराज्याची गुढी उभारली आहे.त्याचप्रमाणे आजच्या तरुणांनी देखील शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन जिवन जगले पाहिजे.शिवाय आज पर्यावरण संतुलन बिघडत चालले आहे.यासाठी प्रत्येक तरुणाने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पुढे आले पाहीजे.प्रत्येकाने आपण निसर्गाचे काही तरी देण लागतो या उद्देशाने एक तरी झाड लावुन पर्यावरणाची हानी भरुन काढण्याचा प्रयत्न केला पाहीजे.असा सल्ला देखील यावेळी महाराजांनी यावेळी दिला.या दरम्यान ज्ञानेश्वर माऊली महाराज यांना साद देण्यासाठी ह.भ.प.विष्णू महाराज सास्ते,ह.भ.प.संतोष महाराज पवार,ह,भ.प.अंबादास महाराज लोखंडे यांच्यासह ईतर महाराज मंडळीची उपस्थिती होती......बॉक्स.....मृत्यू हे जिवनातील अंतिम सत्य.......मनुष्य जन्माला आता तेव्हा खाली हातानेच आला आहे.आणि मृत पावतो तेव्हा खाली हातानेच जाणार आहे.मग आज बहुतांशी लोकांना सत्तेचा व पैशाचा गर्व कशासाठी चढतो.याचा बारकाईने विचार केला पाहीजे.जिवन हा पाण्याच्या बुडबुडा आहे.कधी कोलमडून पडले त्याचा नेम नाही.यासाठी प्रत्येकाशी प्रेमाने वागा.कोणाच्या ताटात माती टाकण्याचे काम करु नका.कारण मृत्यू हे जिवनातील अतिंम सत्य आहे.कोणीही यातुन सुटलेले नाही.समाजात तुम्ही कीती जगला याला महत्त्व नाही तुम्ही कसे जगला याला खुप महत्त्व असल्याचे देखील शेलुदकर यांनी सांगितले.

---

## महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी तर्फे ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी यांच्यातर्फे दिनांक २०.०६.२०२४ रोजी माऊली मंदिर मुर्शदपुर आष्टी येथे आयुष्यमान आरोग्य मंदिर( -धणडक )अंतर्गत ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली ज्येष्ठ नागरिकांचे बीपी व रक्तातील साखर,रक्तातील हिमोग्लोबिन ई.सी.जी,डोळे तपासणी,डायबेटिस,हायपर टेन्शन,हाडांचे आजार,फुफ्फुसाचे आजार यांची मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले.महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील डॉक्टर मोहिनी गोसावी,डॉक्टर अक्षता इथापे, डॉक्टर पूनम मार्कंडे यांनी तपासणी केली.रक्तातील सर्व तपासण्या लॅब टेक्निशियन विशाल गोरे,अमृता



गरगडे यांनी केल्या,औषध वाटप फार्मासिस्ट सुमित खिलारे यांनी केले ,डॉक्टर संभाजी गोसावी यांनी आरोग्य विषयी माहिती व आहाराचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी ११७ ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली व मोफत औषधोपचार देण्यात आले यावेळी महेश आयुर्वेद कॉलेजचे प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थी व महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील इतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन गौतम बोडखे यांनी केले तर माऊली मंदिर समिती व उपस्थितांचे आभार डॉक्टर सविता खेडकर यांनी मानले.

---

## क्रीडा विभागाच्या विविध विषयांसंदर्भात अंकिता पाटील-ठाकरे यांनी घेतली क्रीडा मंत्र्यांची भेट

### मंत्री संजय बनसोडे यांचा सकारात्मक प्रतिसाद निधी उपलब्ध करून देण्यासाठी दिली ग्वाही

**इंदापूर । प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा अध्यक्षा अंकिता पाटील - ठाकरे यांनी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची मुंबई येथे भेट घेतली.यावेळी त्यांनी इंदापूर तालुक्यातील क्रीडा विभागाच्या विविध विषयांसंदर्भात निधी मिळण्यासाठी त्यांना पत्र दिले. इंदापूर तालुक्यातील तरुणांसाठी क्रीडा विभागाच्या विविध विषयांसंदर्भात ही भेट होती. यावेळी अंकिता पाटील यांनी सांगितले की, तालुक्यातील अनेक विद्यार्थी राज्य पातळीवर अनेक क्रीडा प्रकारात त्यांनी नाव कमवले आहे. इंदापूरसाठी ही एक आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. आता या




तरुणांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. याबाबत क्रीडा विभागाच्या विविध विषयांसंदर्भात ही भेट घेतली आहे. यावेळी मंत्री महोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही दिली, असे अंकिता पाटील - ठाकरे यांनी सांगितले.

---

## खाकी...लय भारी मराठी चित्रपटांमध्ये सिने अभिनेत्री शोभा देशपांडे आईच्या भूमिकेत...

शेवगाव पांडुरंग गोरे - आई म्हणून मी कोणां आईस हाक मारी...स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी... आई विषयावरती जशी ही कविता सुंदर आहे तशी, खाकी.. लय भारी या मराठी चित्रपटात आईची सशक्त ,मायाळू ,भूमिका आहे , ज्या चित्रपटात आईची भूमिका नाही...तो चित्रपट गाजत नाही , चित्रपट चालत नाही , जे चित्रपटात आईची माया ,प्रेम आक्रोश, जिव्हाळा दाखवला जातो तो कौटुंबिकचित्रपट थिएटरमध्ये हमखास गल्ला जमवतो , हे समीकरण ठरलेले आहे, आणि सुपरहिट ठरला जातो, या चित्रपटामध्ये आई आणि देश प्रेम याची संयुक्त कहानी दाखवली आहे पुणे येथील सिने अभिनेत्री शोभा देशपांडे यांना खाकी... लय भारी या मराठी चित्रपटामध्ये मुख्य चित्रपटाचे नायक असलेल्या आईची भूमिका करण्याची संधी मिळाली आहे , व त्यांची निवड झाली आहे, अभिनेत्री शोभा देशपांडे हे, चित्रपटासाठी पाच दिवसाच्या शूटिंगसाठी येणार असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधी बोलताना सांगितले आहे,

देशपांडे पुढे बोलत होते की, मी आजवर भरपूर चित्रपटांमध्ये मालिकेमध्ये भूमिका केले आहेत, दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांचा हा पहिलाच मराठी चित्रपट असल्यामुळे मी त्यांच्या चित्रपटामध्ये भूमिका स्वीकारले व हा मराठी खाकी... लय भारी चित्रपट



देशभक्ती वरती आधारित असल्यामुळे या चित्रपटांमध्ये आपलाही परफॉर्मन्स पाहिजे असे मनाला वाटले, आणि हा चित्रपट स्वीकारला आहे, या चित्रपटाची वन लाइन स्टोरी ऐकताच आपण हा चित्रपट स्वीकारला आहे, निर्माते - दिग्दर्शक सतीश खांडवीकर ,पांडुरंग गोरे, श्री उद्धव फंगाळ ,सर पत्रकार संजय लहासे, पत्रकार दिलीप वनवे, उमेश वानखेडे व श्री जितेंद्र चित्ते, राजेंद्र पोपळघट सर, पंकज कांबळे, विक्रम दौंड या टिमचे आपण निवडीबद्दल आभार मानले आहे ,

खाकी, लय भारी १५ ऑगस्ट पासून या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात सुरुवात होणार आहे, हा चित्रपट लवकरचं संपूर्ण महाराष्ट्रभर धमाल करणार असून रिलीज होणार आहे.

**कवि सरकार इंगळी**

---

## सातारा देवळाई वाशियांचे उपोषण

**छत्रपती संभाजीनगर( प्रतिनिधी)**–सातारा देवळाई वाशियांचे उपोषण दिनांक २३/०६/२०२४ रोजी संग्राम नगर जबिंदा मैदान पुलाखाली उपोषण सकाळी ९ते ५ दरम्यान करण्यात आले तात्कालीन ग्रामपंचायत मार्फत सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून घरे बांधलेली आहेत त्यामुळे आम्ही गुंठेवारी कायदा अंतर्गत येत नसल्यामुळे या कायद्यातून वगळण्यात यावे. जवळपास तीनशे लोकांनी या उपोषणामध्ये सहभाग घेतला जो पक्ष गुंठेवारीतून सातारा देवळाईला मुक्त करेल त्याच्यासोबत सातारा दिवाळीचे नागरिक राहतील नवनिर्वाचित खासदार संदिपान भुमरे यांनी सांगितले की दिनांक ४/०७/२०२४ रोजी मिटिंग घेऊन हा प्रश्न सोडवु. माजी. खासदार भागवत कराड यांनी भेट दिली गुंठेवारीचा प्रश्न सोडवुन असे ते म्हणाले विधानपरिषद विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी सांगितले कि विधानपरिषदे हा गुंठेवारीचा प्रश्न मांडु असे ते म्हणाले. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले की आम्ही तुमच्या सोबत आहोत तुमच्या वर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही याची काळजी आम्ही घेऊ. या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख (शिंदे गट) राजेंद्र जंजाळ माजी आमदार नितीन पाटील,भरत राजपुत माझी उपमहापौर राजु शिंदे माझी महापैर नंदकुमार घोडेले ,राजु वैद्य हरीभाऊ हिवाळे ,माजी बाळासाहेब गायकवाड शिवसेना खाजा सरफबुद्दीन माजी नगरसेवक राष्ट्रवादी (शरद पवार गट) आदित्य दहिवाल युवा नेते उबाटा, अभिजीत देशमुख (शरद पवार गट) शुभम नवले मनसे नेते आशिष गायक्वाड सामाजिक कार्यकर्ते खालेद पठाण बिल्डर श्याम राजपुत महाराष्ट्राचे हस्य जत्रा प्रा.स्मिता आवचार प्रा.एकनाथ साळुंके कल्पना राजपूत, अश्विनी बेंद्रे, राजेंद्र फिरोदीया,असद पटेल, लक्ष्मण शिंदे, महेश चिद्रवार,बाबासाहेब देशमुख, पद्म सिंग राजपूत, भारती भांडेकर, लक्ष्मण शिंदे सविता कुलकर्णी, शरद देशपांडे, अनिरुद्ध जहागीरदार, नामदेव पवार ,मिनल ईपर राजीव थिटे पाटील, ज्ञानेश्वर बोरसे, आनंत सोन्नेकर, विलास देव, गजेंद्र निळेकर, राजू द्याडे, शितल पाडोळकर निर्मला मस्के, योगिता बेनसुरे,लंगडे साहेब,दिपक सूर्यवंशी, विजया ढवळे, तुळशीदास कुलकर्णी, उध्दव डंबाळे.

---

### संगमनेर तालुका ग्रामीण पत्रकार संघ व डॉ.मैड डेंटल केअर क्लिनीक सेंटरच्या वतीने

## योग दिनानिमित्त मनोहरबाबा विद्यालयात मोफत दंत चिकित्सा शिबीर संपन्न

**संगमनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील सायखिंडी येथील श्री. मनोहर बाबा विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संगमनेर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघ व डॉ. मैड डेंटल केअर क्लिनीक अँड इम्प्लांट सेंटरच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी व पालक यांचे मोफत दंत चिकित्सा शिबीर संपन्न झाले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सायखिंडी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहनराव करंजकर होते.उपस्थितांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप सातपुते यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर योगासन प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना एक टुथब्रश, टुथपेस्ट,पेन आदी शैक्षणिक साहित्य वाटप डॉ.सागर मैड डेंटल क्लिनीक केअर यांचे वतीने करण्यात आले. यावेळी ग्राम पंचायत सायखिंडी याचे वतीने येणाऱ्या पाहुण्यांना वृक्षारोपणा साठी वृक्ष देण्यात आले.सदर कार्यक्रमास एकवीरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, संगमनेर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रकांत महाले, डॉ. मैड डेंटल केअर सेंटरचे संचालक डॉ. सागर मैड, व डॉ.कांचन मैड, डॉ.अस्मिता लांडगे, डॉ.स्मिता तांबे, डॉ.साई खळदकर,सिस्टर,अनिता, गायत्री,व कोल्हे बाबा सह इत्यादी स्टाफ तसेच श्री मनोहर दुध संस्थेचे चेअरमन मारुती दादा गांडोळे, उपसरपंच दिपक करंजकर,विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन डॉ.सागर गांडोळे,श्री मनोहरदास बाबा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव अँड गणपतराव गांडोळे, संचालक संजय खतोडे,माजी सरपंच नवनाथभाऊ



शिंदे,माजी केंद्र प्रमुख शिवनाथ पारधी,सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव पारधी,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश बो-हाडे, सोसायटीचे माजी चेअरमन गोपीनाथ गांडोळे,अँड शिवाजीराव ताजनपूरे, ज्येष्ठ कार्यकर्ते राजाराम शिंदे,बस्तीराम गांडोळे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी संगमनेर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रसाद सुतार, कार्याध्यक्ष सुशांत सातपुते, सचिव संदीप सातपुते,सहसचिव राजु शेख, खजिनदार जिजाबा हासे,प्रजासत्ताक न्युजचे संपादक सलीम शेख, प्रतिनिधी हुसेन पटेल,जनता ठाणेदार न्युज चे संपादक रामा लोखंडे,पत्रकार संतोष डुबे, वसंत बंदावणे,ओंकार संस्कर,न्युज सुपर वन चे दिनेश बांगर,पत्रकार संघाचे कायदेशीर सल्लागार अँड संग्राम जोंधळे,आदी प्रतिनिधी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जयराम खर्डे व गजानन गायकवाड यांनी केले. सदर कार्यक्रमास विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

---

### मुख्याधिकारी नीता अंधारेंच्या पुढाकारातून

## बीडच्या शिवतिर्थावर ११० फूट उंचीवर शिवरायांचा भगवा

### कर्तव्यदक्ष अधिकारी नीता अंधारे यांचे कौतुक व सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शिवाजी महाराज चौकात ११० फूट उंचीचा पोल बसवून त्यावर शिवरायांचा भगवा ध्वज फडकवला जाणार आहे. यासाठी आज रविवारी मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी जागेची पाहणी करुन प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नीता अंधारे यांच्याकडे पाहिले जातं त्यांनी सामाजिक कार्यकर्त्यांना आणि अशा सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देऊनच शहराचा सर्वांगीण विकास आणि सुसज्जपणा व बीड शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी कुठलाही निधी कमी पडू न देता प्रयत्न केलेले आहेत यामुळे शिवप्रेमींकडून आनंद साजरा करण्यात येत आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाणता राजा छत्रपतींचा अश्वारूढ देखना पुतळा असून, यामुळे शहराचे वैभव समजते. येथेच चौकात आता ११० फूट उंचीचा पोल उभारुन त्यावर स्वराज्याची साक्ष आज प्रत्यक्षात कामाला सुरुवात; शिवप्रेमींकडून अंधारेंचे स्वागत करण्यात आले यावेळी पाणीपुरवठा अधिकारी राहुल टाळके, स्वच्छ्ता निरीक्षक भागवत जाधव, योगेश हाडे, यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवप्रेमींकडून मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे आभार व्यक्त करीतत्यांचा सत्कार केला.

# ना.मुनगंटीवार यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय स्पर्धेत चंद्रपूरचा गौरव वाढविणाऱ्या योगपटूंचा सत्कार

## बँकॉक येथील स्पर्धेत १३ सुवर्ण व ३ रौप्य पदकांची कमाई : महिला पतंजली योग समितीच्या कार्याचेही कौतुक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बँकॉक (थायलंड) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत १३ सुवर्ण आणि ३ रौप्य पदकांवर नाव कोरणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील योगपटूंचा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार झाला. योगसाधनेसारखे ईश्वरीय कार्य तरुण पिढी करीत असल्याबद्दल त्यांनी अभिमान देखील व्यक्त केला.योगासनांच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणाऱ्या महिला पतंजली योग समिती चंद्रपूरच्या वतीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला आलोक साधनकर, डॉ. मंगेश गुलवाडे, स्मिता रेबनकर, तानाजी बायस्कर, स्वप्नील पोहनकर, अनिकेत ठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

बँकॉक येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वरोरा येथील एसए योगा इन्स्टिट्यूटच्या ८ योगपटूंनी ट्रॅडिशनल, रिदमीक सिंगल योगा, रिदमीक पेअर योगा आणि आर्टिस्टिक पेअर योगा या ३ योग प्रकारांमध्ये ऐकूण १३ सुवर्ण आणि ३ रौप्य पदके पटकावली. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या १३ देशांमधील १२७ योगपटूंमध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करणे अभिमानास्पद असल्याची भावना ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. ना. मुनगंटीवार म्हणाले, 'हजारो वर्षांपूर्वीपासून शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगसाधना केली जाते,देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी याच योगसाधनेला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त करून दिले. २१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या माध्यमातून १७५ देश योगसाधनेशी जोडले गेले. आज लंडनमध्ये १ तास योगा शिकविण्यासाठी ५० ते १०० पाऊंड म्हणजे ५ ते १० हजार रुपये योगशिक्षकांना



दिले जातात. यावरून आपल्याला योगासनांचे महत्त्व लक्षात येईल. मनाचे समाधान धनामध्ये नाही तर योगामध्ये आहे, हे सिद्ध झाले आहे आणि जगानेही मान्य केले आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील योगपटूंनी योगसाधनेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली कामगिरी गौरवास्पद ठरते.' चांगले काम केल्यानंतर होणारा गुणगौरव प्रेरणादायी असतो. महिला पतंजली योग समितीने योग कार्याचा विस्तार करावा. मी सदैव तुमच्यासोबत आहे, असा विश्वासही ना. मुनगंटीवार यांनी दिला.

आंतरराष्ट्रीय योगपटूंचे कौतुक

बँकॉक येथील आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत पदकांची कमाई करणारे खेळाडू व एसए योगा इन्स्टिट्यूटचे संस्थापक अनिकेत ठक व स्वप्नील पोहनकर यांचे कौतुक व अभिनंदन केले. हे खेळाडू गेल्या ४ वर्षांपासून नित्यनेमाने सराव करीत आहेत. यामध्ये सई नेवास्कर-१ सुवर्ण व १ रौप्य, स्वर्णिका नौकरकर - २ सुवर्ण, शर्वरी मिटकर - २ सुवर्ण, गायत्री पाल- १ सुवर्ण व १ रौप्य, शौनक आमटे- २ सुवर्ण, साहिल खापणे- २ सुवर्ण, श्रीकांत घानवडे- १ सुवर्ण व १ रौप्य, राम झाडे - २ सुवर्ण या योगपटूंचा समावेश आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात योग दिन साजरा





**भद्रावती । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने काल दि. २१ जून,२०२४ योग दिन स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात साजरा करण्यात आला. १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जी. उमाटे होते. मार्गदर्शक म्हणून सरिता सातपुते, कान्होपात्रा कवाडे, महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. याप्रसंगी सरिता सातपुते यांनी योगाविषयी माहिती दिली. तसेच योग प्रात्यक्षिक सुद्धा विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून करून घेतले. प्राचार्य, डॉ. उमाटे म्हणाले की, १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयात योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, शिक्षकांना शिस्त लाभावी हाच उद्देश योग दिवसाचा आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. आर.जी. पारेलवार तर आभार प्रदर्शन प्रा. कु. संगीता बांबोडे यांनी केले.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या प्रसाद देठे यांच्या कुटुंबाची ओमराजे यांनी घेतली भेट

## मराठा समाजातील युवकांनी टोकाचे पाऊल उचलू नये खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**बार्शी । प्रतिनिधी**

येथील रहिवासी असलेले प्रसाद देठे यांनी मराठा समाजास आरक्षण न दिल्याकारणाने आत्महत्या करत टोकाचे पाऊल उचलले होते. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर प्रत्येक आंदोलना रस्ता रोको वेळी प्रसाद देते हे सक्रिय राहून समाज बांधवांसाठी काम करत होते.त्यांच्या राहत्या घरी जाऊन खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व धाराशिव कळंब चे आमदार श्री कैलास घाडगे पाटील यांनी प्रसाद देठे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात आली.



मराठा समाजात तरुणांनी असे टोकाचे पाऊल उचलू नये आत्महत्या आरक्षण मिळविण्याचा पर्याय असू शकत नाही तसेच आपल्या पाठीमागे कुटुंबीय आहे त याचा जरूर विचार करावा असे मराठा समाजातील युवकांनी असे टोकाचे पाऊल उचलून असी कळकळीची विनंती समाज बांधवांना केली आहे.

# देवराव भोंगळे यांच्या संकल्पनेतून पहाडावरील नागरीकांसाठी जिवतीत महाआरोग्य शिबीर

## १११७ रुग्णांनी केली विविध आजारांची नि:शुल्क तपासणी, तर ३४७ रुग्ण शस्त्रक्रियेस पात्र

**जिवती । प्रतिनिधी**

ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालय जिवती तथा आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी(मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने आज (दि. २३) जिवतीतील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते तथा तालुकाध्यक्ष केशव गिरमाजी व धोंडाअर्जुनीचे जेष्ठ नेते शंकर राठोड यांच्या हस्ते संपन्न झाले.

नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात दिवसभर चाललेल्या या शिबीराचा जिवती तालुक्यातील १११७ नागरीकांनी लाभ घेतला.

सकाळी नऊ वाजता सुरू झालेल्या या शिबीरात मेडिसीन, नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रिरोग, कान-नाक-घसा, अस्तिरोग, त्वचारोग आणि कॅन्सर यांसारख्या रोगांवरील तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. यामध्ये तपासणी झालेल्या १११७ रुग्णांपैकी ३४७ रूग्ण हे शस्त्रक्रियेकरीता पात्र ठरले. त्यांचेवर उद्यापासून टप्प्या-टप्प्याने आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) येथे शस्त्रक्रिया पार पडणार





आहेत.

या शिबिरामध्ये बोलताना, आयोजक तथा माजी जि. प. अध्यक्ष तसेच राजुरा विधानसभेचे निवडणूक प्रमुख देवराव भोंगळे म्हणाले की, लोकनेते, विकासपुरुष ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी आम्हाला सेवेचा मंत्र दिला आहे. खरंतर सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या नावाचं समानार्थी शब्दच सेवा असा होतो आणि त्यांच्या सेवेचा वसा पुढे नेत मागील अनेक वर्षांपासून आम्ही जिल्ह्यात ठिकठिकाणी अशा पद्धतीच्या महाआरोग्य शिबीरांचे आयोजन करतो. ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांची शिकवण आहे, की विजय झाला तर माजायचं नाही आणि पराभव झालं तर लाजायचं नाही.' त्यामुळे गोरगरीबांच्या हाकेला ओ देण्यासारखे दुसरे पुण्य नाही, ही भावना जोपासून आम्ही लोकसेवेचा हा यज्ञ चालू केला आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात ग्रामीण भागातील गोरगरिब बांधव आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात; अनेकदा पैशाअभावी अतीगंभीर आजार अंगावर काढतात त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने भविष्यात अनेक समस्या उद्भवू शकतात. अशावेळी दुर्गम समजल्या जाणाऱ्या पहाडावरील गोरगरिब बांधवांना पायाच्या नखापासून तर डोक्याच्या केसापर्यंत भेडसावणाऱ्या समस्यांचे एकाच छताखाली निदान, उपचार व शस्त्रक्रिया मोफत करून देण्यासाठी मा. ना. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राच्या माध्यमातून अशाप्रकारच्या महाआरोग्य शिबीराचे आज आयोजन करण्याचे आले आहे. या शिबिराचा जिवती परीसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. अनेक गरजू माताभगिनींना यामुळे आजारांचे निदान व उपचार मिळविता आले याचे मला आत्मीय समाधान वाटते. पुढे बोलताना, पुढच्या टप्प्यामध्ये राजुरा विधानसभा क्षेत्रातील गडचांदूर व राजुरा याठिकाणी सुद्धा अशाप्रकारच्या भव्य महाआरोग्य शिबीरांचे लवकरच आयोजन होणार असून नागरिकांनी त्या ठिकाणीही अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन करीत शिबीराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेणाऱ्या तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे त्यांनी यावेळी आभार ही मानले. या शिबिरात भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष महेश देवकते, दत्ता राठोड, गोपीनाथ चव्हाण, गोविंद टोकरे, तुकाराम वारलवाड, माधव नेवळे, पुंडलिक गिरमाजी, संतोष जाधव, सुरेश धोटे, अनंता येरणे, आनंद कदम, राजेश राठोड, राजू बेल्लाळे, मारोती बेल्लाळे, साहेबराव राठोड, गोवर्धन चव्हाण, भरत विराजदार, भिकू राठोड, प्रल्हाद जाधव, शिवाजी भोईनवार, प्रल्हाद मदने, फरीद शेख, राजू राजपंगे, उल्हास जाधव, उखंडराव चव्हाण, राजेश बेल्लाळे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

## मेडीविजन व जनहित मंचाद्वारे योग दिन साजरा

# स्वस्थ व निरामय आयुष्यासाठी करा योगाभ्यास-डॉ.आसमवार

**वर्धा । प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त मेडीविजन वर्धा नगर शाखा तसेच जनहित मंचाच्या संयुक्त विद्यमाने आय.टी.आय. टेकडी वर्धा येथील मुक्तांगण परिसराच्या निसर्गरम्य वातावरणात योगाभ्यास कार्यक्रम संपन्न झाला.

सकाळी ६ ते ७ वाजताच्या दरम्यान सामूहिक योग व प्राणायामासाठी यामध्ये विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद राहिला. वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने कार्यरत असणाऱ्या मेडिविजन टीम ने दैनंदिन आयुष्यात योग व प्राणायमाचे महत्व सांगून जागतिक योग दिन साजरा केला. याप्रसंगी मेडिविजन चे कार्यकर्ते रौनक जैन यांनी आपले मत व्यक्त केले. स्वस्थ आणि निरामय आयुष्य जगण्यासाठी योग व प्राणायमाला आपल्या दिनचर्येत विशेष प्राधान्य द्यावे, यामुळे मन प्रसन्न होत असल्याचे




मत रौनक जैन यांनी मांडले. दरम्यान जनहित मंच वर्धाचे सचिव डॉ.राजेश आसमवर यांनी येणाऱ्या काळात मेडीविजन टीमच्या सहयोगाने जनहित मंच वर्धा शहरात आणखी आरोग्य संवर्धक शिबीरे आणि उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी मेडिविजन वर्धा नगर शाखेचे संयोजक क्रिष्णा कासोडकर यांनी सुद्धा आपले मत व्यक्त केले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे उज्वल मसने, वेदांत बावनकर, मंथन नलगे त्याचप्रमाणे रौनक जैन, विपुल सुराना, आतश राऊत, उत्कर्ष यश्वी, क्रिष्णा कासोडकर व मेडिविजनच्या अन्य कार्यकर्त्यांसह जनहित मंच आणि मोठ्या संख्येने वैद्यकीय विद्यार्थी उपस्थित होते.

# गोरगरीब जनतेच्या पाठीशी सदैव राहणार-काँगेस नेते महेश मेंढे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून संडे मार्केटच्या फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांसोबत संवाद साधून त्यांच्या समस्या आणि त्यांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी कशा दूर करता येईल या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यवसायिकांना ज्या समस्या येतात त्या समस्या संबंधी प्रश्नांना घेऊन काँग्रेसच्या माध्यमातून निश्चितच लढा देण्यात येईल तसेच गोरगरीब जनतेच्या पाठीशी सदैव राहणार असे आश्वासन काँग्रेस नेते महेश मेंढे यांनी दिले.

कार्यक्रमादरम्यान फूटपाथ वर व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यवसायिकाच्या पावसापासून संरक्षण व्हावं म्हणून काँग्रेस नेते महेश मेंढे यांच्या माध्यमातून छत्र्या वाटप करण्यात आले. जनसंवाद कार्यक्रमामध्ये मंचावर सामाजिक



कार्यकर्ते सय्यद हाजी, अधिवक्ता मोहम्मद रफीक शेख, काँग्रेस युथ महासाचिव कादर शेख,संडे मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष हमीद रजा राजा भाई आदी प्रामुख्याने उपस्थित होते. मोठ्या संख्येने संडे मार्केट असोसिएशन चे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन मोहम्मद इरफान शेख यांनी केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .